॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १० मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* सुविचार *
चारित्र्य स्वच्छ तसेच
चमकणारे असावे.

# राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शाईफेक

## वारकरी संप्रदायातील कथित घुसखोरीवरून हल्ला । लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**● पुणे । वीरभूमी –**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शनिवारी सकाळी शाईफेक आणि धक्काबुक्की करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात संग्राम भंडारे आणि त्यांच्या समर्थकांवर आरोप करण्यात आले असून, वारकरी संप्रदायातील कथित घुसखोरीच्या मुद्द्यावरून निर्माण झालेला वाद अधिक चिघळल्याचे दिसून येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, विकास लवांडे हे आळंदी परिसरात एका धार्मिक कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रमानंतर ते पुण्याकडे परतत असताना काही वाहनांतून आलेल्या व्यक्तींनी त्यांची गाडी अडवली. त्यानंतर त्यांच्या अंगावर शाई टाकण्यात आली तसेच धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काही जणांकडे शस्त्रे होती आणि जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचाही दावा लवांडे यांनी केला. घटनेनंतर त्यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली. हल्लेखोरांवर कठोर कारवाई होईपर्यंत पोलीस ठाणे सोडणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. या घटनेनंतर विकास लवांडे यांनी एक चित्रफीत प्रसिद्ध करून आपली बाजू मांडली. त्यांनी सांगितले की, काही दिवसांपासून आपण वारकरी संप्रदायातील कथित कट्टरवादी प्रवृत्तींबाबत भूमिका मांडत होतो. त्याचाच राग मनात धरून हा हल्ला करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

गेल्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीची घुसखोरी होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनीही एका लेखातून समतेचा आणि प्रबोधनाचा वारसा जपणार्या या परंपरेत काही अतिरेकी विचार वाढत असल्याची चिंता व्यक्त केली होती. त्यानंतर विकास लवांडे यांनी काही कीर्तनकार आणि प्रवचनकारांची नावे जाहीर करत त्यांच्यावर वारकरी परंपरेच्या मूलभूत विचारांना धक्का पोहोचवल्याचा आरोप केला होता. या यादीत अनेक धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश असल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप सुरू झाले होते.

### सामजिक प्रबोधनाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न : रोहित पवार

■ या हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तीव्र निषेध करण्यात आला आहे. आमदार रोहित पवार यांनी सामाजिक प्रबोधनाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. त्यांनी हल्लेखोरांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

### पदाधिकार्यावर हल्ला होणे गंभीर बाब : खा. सुप्रिया सुळे

■ खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनेवर प्रतिक्रिया देताना राज्यातील कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली. भररस्त्यात राजकीय पक्षाच्या पदाधिकार्यावर हल्ला होणे गंभीर बाब असल्याचे सांगत त्यांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. या घटनेमुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, वारकरी संप्रदाय, सामाजिक प्रबोधन आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांभोवतीचा वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### वार-करी

माफ कर बा विठ्ठला
हे आमचेच वेडे चाळे
आम्हीच करू आता
एकमेकांचे तोंड काळे
पुरोगामी शहाणपण
असे जाईल आता कुठे
देवाच्या नावाखाली जर
हे वारकरीच आड-मुठे

## SPOT NEWS

### डिआरडीओ कडून अत्याधुनिक 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**● भुवनेश्वर –** भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (DRDO) शुक्रवारी संरक्षण क्षेत्रात एक मोठी झेप घेतली आहे. भारताने अत्याधुनिक अशा 'अग्नी' (Advanced Agni) क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली असून, यामुळे देशाच्या सामरिक आणि संरक्षण क्षमतेत मोलाची भर पडली आहे. या क्षेपणास्त्राचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे MIRV तंत्रज्ञानाने सज्ज आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे एकाच क्षेपणास्त्राद्वारे एकाच वेळी वेगवेगळ्या दिशांना असलेल्या अनेक लक्ष्यांवर अचूक मारा करणे शक्य होणार आहे. या चाचणीमुळे भारताची अण्वस्त्र प्रतिबंधक क्षमता अधिक मजबूत झाली आहे. एकाच वेळी अनेक शत्रू तळांना उद्ध्वस्त करण्याची क्षमता प्राप्त झाल्याने, जगातील मोजक्या बलाढ्य देशांच्या पंक्तीत भारताने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. आधुनिक संरक्षण तंत्रज्ञानात स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे.

### जगभरात महागाईचा भडका

**● नवी दिल्ली –** महागाई कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे मापक आहे. थोडी महागाई सामान्य असते, पण जेव्हा लक्षणीयरीत्या वाढते, तेव्हा बाजाराची परिस्थिती खूप कठीण होऊन जाते. गेल्या काही वर्षांत जागतिक पातळीवरील महागाईने उच्चांक गाठला असून काही देशांमधील महागाई दर इतका प्रचंड आहे की इथे लोकांना जगणेही मुश्किल झाले आहे. दरम्यान, भारतात महागाईची झळ कमी वाटत असली तरी युद्धामुळे वाढलेल्या किमती आणि चलनाचे अवमूल्यन यामुळे भारतीयांना फार मोठी किंमत मोजावी लागत आहे. त्यामुळे चिंता वाढली आहे.

# दिल्लीत आत्मघाती हल्ल्याचा कट!

## सरकारी कार्यालये रडारवर, सुरक्षा वाढविली

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

राजधानी दिल्लीत हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. गुप्तचर यंत्रणांना मिळालेल्या काही संवेदनशील माहितीनंतर दिल्ली पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणा सतर्क झालेल्या आहेत. तसेच दिल्लीतील अनेक संवेदनशील भागातील सुरक्षआ वाढविण्यात आली आहे. भाजप मुख्यालय, सरकारी कार्यालये, गर्दीच्या ठिकाणी दहशतवादी हल्ले होऊ शकतात, अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे.

एजन्सींना संशय आहे की, दीनदयाल उपाध्याय मार्गावरील कार्यालयांना आत्मघाती हल्ले, कार बॉम्बस्फोट, गोळीबार किंवा आयईडीद्वारे लक्ष्य केले जाऊ शकते. कोणताही धोका टाळण्यासाठी सुरक्षा दलांनी पाळत आणि प्रतिबंधात्मक उपाय वाढवले आहेत. पोलिस आणि सुरक्षा दलांनी अतिरिक्त जवानांची तैनाती, तपासणी आणि सीसीटीव्ही पाळत वाढवली आहे. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी बॅरिकेडिंग आणि वाहनांची रँडम तपासणी करण्यासोबतच सुरक्षा एजन्सी कोणत्याही संभाव्य धोक्याला प्रतिबंध घालण्यासाठी समन्वयाने काम करत आहेत.

संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्रीपासूनच सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. भारतीय जनता पक्षाचे मुख्यालय, दीनदयाल उपाध्याय मार्गावरील कार्यालये आमि आजूबाजूच्या शासकीय आस्थापनांमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. अतिरिक्त सशस्त्र पोलिस दल तैनात करण्यात आले असून, बॅरिकेडस् वाढविण्यात आले आहेत.

बॉम्ब निकामी करणारी पथके, स्निफर डॉग युनिट्स आणि जलद प्रतिसाद पथके हाय अलर्टवर ठेवण्यात आली आहेत. दिल्ली अग्निशमन सेवेलाही सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोलिसांना संवेदनशील भागांमध्ये संशयास्पद हालचालींवर, बेवारस वस्तूंवर आणि उभ्या वाहनांवर कडक नजर ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

# अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**● मुंबई । वीरभूमी –**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता राज्यभरातील विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेकडे लागले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे ८ मेपासून सुरू झाली असून शिक्षण विभागाने संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. यंदाही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच पार पडणार असून विद्यार्थ्यांना घरबसल्या अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रियेची 'झिरो राऊंड' म्हणजेच शून्य फेरी ८ मे ते २० मेदरम्यान पार पडणार आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग-१ भरता येणार आहे. तर ११ मे ते १३ मे या दरम्यान विद्यार्थ्यांना भाग-१ आणि भाग-२ पूर्ण करण्याची संधी दिली जाणार आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीनुसार किमान १ ते जास्तीत जास्त १० कनिष्ठ महाविद्यालयांची निवड करता येणार आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी विद्यार्थी वेगवेगळ्या महाविद्यालयांचा पर्याय निवडू शकतात.

१४ आणि १५ मे रोजी तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्यासाठी १६ मे हा दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. यानंतर २१ मेपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. २१ आणि २२ मे हे अर्जाचा भाग-१ आणि भाग-२ भरण्याचे अंतिम दिवस असतील. अर्ज सादर करण्यासाठी सकाळी ६ वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर २३ ते २६ मेदरम्यान महाविद्यालयांकडून प्रवेश यादी प्रसिद्ध केली जाईल. ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालये मिळतील, त्यांना २६ ते २८ मे दरम्यान संबंधित महाविद्यालयात जाऊन प्रत्यक्ष प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

पहिल्या फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांची माहिती २९ मे रोजी जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर दुसर्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक ३० मे रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

# राष्ट्रीय महामार्गांवरील टोलनाके होणार गायब! देशभरात 'कॅशलेस टोल'

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

महामार्गांवरून प्रवास करायचा म्हणजे टोल नाक्यांवरील लांबच लांब रांगांची कटकट. फास्टॅगमुळे हा प्रवास वेगवान झाला असला तरी अनेकवेळा तांत्रिक बिघाड किंवा पेमेंट फेल झाल्यामुळे वाहनांना पुन्हा थांबावे लागते आणि प्रवासात वेळ वाया जातो. पण नितीन गडकरींच्या नव्या मास्टरप्लॅनमुळे ही रोजची चिंता मिटणार आहे. २०२६ अखेरपर्यंत देशातील सर्व राष्ट्रीय महामार्गांवरील टोल प्लाझा हटवणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

सध्या सुरू असलेल्या टोल नाक्यांऐवजी एका आधुनिक प्रणालीचा वापर केला जाणार आहे. यामुळे टोल नाक्यावर न थांबताच प्रवासी आधीपेक्षा वेगवान प्रवास करू शकतात. या नव्या सिस्टिमअंतर्गत, वाहनांनी प्रत्यक्ष पार केलेल्या अंतरानुसारच त्यांच्याकडून टोल आकारला जाणार आहे. टाइम्स ग्रुपच्या 'टाइम्स ड्राईव्ह ऑटो समिट अँड अवॉर्डस् २०२६'या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. त्यावेळी नितीन गडकरींनी 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन टेक्नॉलॉजी अँड फास्टॅग'वर आधारित प्रणालीबद्दल माहिती दिली. या नवीन प्रणालीची सध्या चाचणी सुरू आहे. देशभरातील ८५ टोलनाक्यांवर यापूर्वीच ही सेवा सुरू करण्यात आली आहे.



प्रवासी आता ठराविक टोल भरण्याऐवजी 'पे-पर-यूज'प्रमाणे टोल भरतील. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रणालीबद्दल बोलताना सांगितले की, २०२६ च्या अखेरपर्यंत भारतात टोल नाके राहणारच नाहीत. टोल भरण्याची चिंता न करता ताशी ८० किमी वेगाने वाहनचालक प्रवास करू शकतात. हाय-टेक कॅमेरे आणि जीपीएस-आधारित ट्रॅकिंगचा वापर करून वाहनांची ओळख पटणार आहे. त्यानंतर वाहनांशी थेट लिंक केलेल्या खात्यांमधून टोलची रक्कम वजा होईल. टोल नाक्यावरील वाचलेल्या वेळामुळे इंधनाची बचत होणार आहे. तसेच, टोलचे पैसेही वाचणार आहेत.

फास्टॅगच्या यशानंतर देशभरात ही सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. फास्टॅगची अंमलबजावणी झाली त्यानंतरही काही तांत्रिक त्रुटी निर्माण होत होत्या. त्यामुळे प्रत्यक्ष बूथ आवश्यक होते. पण गर्दीच्या वेळी त्यामुळे प्रवासात अडथळे निर्माण होत होते. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत हे तंत्रज्ञान फुलप्रूफ आहे याची खात्री पटण्यासाठी सरकारने चाचण्या सुरू केल्या आहेत. या प्रणालीमध्ये फास्टॅग आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन तंत्रज्ञान वापरले जाते. आरएफआयडी वाचक आपले फास्टॅग स्टिकर स्कॅन करतात. त्याच वेळी, एआय-पावर्ड कॅमेरे एएनपीआर वापरून आपल्या वाहनाची नंबर प्लेट वाचतात.

### अधिक कठोर नियम

■ या नव्या प्रणालीमुळे टोलचे नियम अधिक कठोर करण्यात येणार आहेत. जर एखाद्या वाहनचालकाच्या खात्यातून रक्कम वजा झाली नाही तर मालकाला ई-नोटीस पाठवली जाते. जर फास्टॅग पाळला गेला नाही तर फास्टॅग निलंबित केला जाऊ शकतो. दंड ९अअठ डेटाबेसशी देखील जोडला जाऊ शकतो. कॅश लेन नसल्याने प्रत्येकाला या यंत्रणेचे पालन करावे लागेल.

# SPOT NEWS

## देर्डे चांदवड येथील न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल ९० टक्के

● **कोपरगाव । वीरभूमी-**

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित कोपरगाव तालुक्यातील देर्डे चांदवड येथील न्यू इंग्लिश स्कूलने आपल्या यशाची उज्वल परंपरा यावर्षीही कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९० टक्के लागला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी नेहमीप्रमाणे शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा रोवला आहे. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये श्रद्धा सोमनाथ खरात हीने ७४.२० % गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. शिवानी शांताराम गायकवाड हिने ६९.८० % गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर समृद्धी संजय रहाणे हीने ६९.६० % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड आणि संस्थेच्या सचिव सौ. चैतालीताई काळे, सोसायटीचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्या प्राचार्य, शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचा कारभार लोकाभिमुख

## सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक उपक्रमांमुळे निघोजचा नावलौकिक वाढतोय : आ. सत्यजित तांबे

● **निघोज । वीरभूमी -**

राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या मळगंगा मातेचा महिमा अगाध आहे. या देवस्थानाच्या माध्यमातून सुरू असलेले सामाजिक व धार्मिक उपक्रम मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, ग्रामस्थ मंडळ आणि मुंबईकर मंडळ यांच्या एकोप्याच्या कार्यातून राबविले जात असून, गावाचा नावलौकिक वाढविण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन आमदार सत्यजित तांबे यांनी केले.




आमदार तांबे यांनी शनिवार, दि. ९ रोजी निघोज येथे भेट देत जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. यावेळी त्यांनी 'शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिका' तसेच ट्रस्ट कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर आणि माजी सहसचिव शिवाजी वराळ यांच्या हस्ते आमदार तांबे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सहसचिव विश्वासराव शेटे, विश्वस्त बबनराव ससाणे, रोहिदास लामखडे, विठ्ठलराव कवाद आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार तांबे म्हणाले की, ट्रस्ट संचालित अभ्यासिकेच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत आहेत. निघोज आणि परिसराचा शैक्षणिक विकास मोठ्या प्रमाणात होत असून, या अभ्यासिकेमुळे गुणवंत विद्यार्थी घडत आहेत. अभ्यासिकेसाठी आवश्यक ती पुस्तके उपलब्ध करून देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. तसेच माजी सहसचिव शिवाजी वराळ यांनी गावविकासाच्या उपक्रमांचा आढावा मांडला.

# शेवगाव शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणात चौघांचा जामीन फेटाळला

## १ कोटी ६१ लाखांच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

● **शेवगाव । वीरभूमी-**

शेवगाव तालुक्यात गाजलेल्या शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील सहआरोपी जालिंदर बाळासाहेब काळे, शरद अंकुश काळे, राजेश एकनाथ काळे यांच्या नियमित जामीन अर्जासह उमेश उर्फ बाल्या सुखदेव गायकवाड याचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी फेटाळून लावला.

शेवगाव येथील रहिवासी फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी मुख्य आरोपी साईनाथ कल्याण कवडे याच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, आरोपीने स्वतःची सिटेक सोल्युशन्स ही शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनी असल्याचे भासवून गुंतवणुकीवर १२ टक्के परताव्याचे आमिष दाखवले होते. या आमिषाला बळी पडून फिर्यादीसह इतर गुंतवणूकदारांनी आरोपीकडे एकूण १ कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची गुंतवणूक केली होती.

मात्र, आरोपीने गुंतवणूकदारांना अपेक्षित परतावा दिला नाही तसेच मूळ रक्कमही परत केली नाही. त्यामुळे गु.र. नं. ८८७/२०२४ अन्वये दि. २८ ऑक्टोबर २०२४ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात आरोपी व सहआरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर सहआरोपी जालिंदर काळे, शरद काळे व राजेश काळे यांनी नियमित जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. तसेच सहआरोपी उमेश उर्फ बाल्या गायकवाड याने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. या दोन्ही अर्जांना फिर्यादी अवधूत विनायक केदार यांच्या वतीने उच्च न्यायालयातील ड. प्रशांत प्रभाकर गिरी तसेच अॅड. पंकज पद्माकर खराडे यांनी तीव्र विरोध केला.

न्यायाधीश केदार एस. कुलकर्णी यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे व तपासातील बाबींचा सखोल विचार केला. आरोपींनी खोटी आश्वासने देऊन गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच उच्च न्यायालयातील रिट याचिकेत दिलेल्या हमीचा भंग झाल्याचेही नोंदीतून स्पष्ट झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

आरोपींना जामीन मंजूर झाल्यास ते फरार होण्याची तसेच साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध ठोस पुरावे लक्षात घेता संबंधित आरोपींना जामीन देणे योग्य नसल्याचे सांगत न्यायालयाने सर्व अर्ज फेटाळून लावले.

या प्रकरणात मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांच्या वतीने अॅड. प्रशांत प्रभाकर गिरी, अॅड. पंकज पद्माकर खराडे यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यांना अॅड. योगेश कासोद, अॅड. पवन जोंधळे आणि अॅड. तुषार जगताप यांनी सहकार्य केले.

# श्रीगोंदा येथे राष्ट्रीय लोक न्यायालयात विविध प्रकरणांचा निपटारा; तडजोडीतून जलद न्याय मिळवण्याचे आवाहन

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**

जिल्हा न्यायालय, श्रीगोंदा येथे दि. ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोकन्यायालयामध्ये निकाली काढून वेळ व पैसा वाचवावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश श्री. एस. एच. साळुंखे यांनी केले.

### ४ कोटी ११ लाख २८ हजारांची वसुली

■ लोक न्यायालयामध्ये दाखल ४५ प्रकरणे निकाली काढून १ कोटी ७३ लाख ७८ हजार ८९० रुपयांची वसुली करण्यात आली. तसेच दाखलपूर्व ३९५९ प्रकरणे निकाली निघून २ कोटी ३७ लाख ४९ हजार २१२ रुपयांची वसुली झाली. अशा एकूण ४००४ प्रकरणांमधून तब्बल ४ कोटी ११ लाख २८ हजार १०२ रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी बोलताना जिल्हा न्यायाधीश साळुंखे म्हणाले की, पूर्वीच्या काळात गावांमध्ये पंचासमक्ष भांडणे मिटवली जात असत, त्याचप्रमाणे लोकन्यायालयामध्ये देखील तडजोडीने प्रकरणे निकाली काढली जातात. लोकन्यायालयात प्रकरणे निकाली निघाल्यामुळे पक्षकारांना जलद न्याय मिळतो व दोन्ही पक्षांमध्ये सलोख्याचे संबंध कायम राहतात. त्यामुळे सर्वांनी जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष अॅड. जे. बी. शिंदे यांनी लोकअदालतीचे महत्त्व व फायदे याविषयी उपस्थित पक्षकारांना माहिती देऊन लोकन्यायालयामध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन केले.

यावेळी एम. एम. राव साहेब, जिल्हा न्यायाधीश-१ ए. एन. कुलकर्णी, सहदिवाणी न्यायाधीश व स्तर एच. जे. पठाण, द्वितीय सहदिवाणी न्यायाधीश व स्तर श्री. आर. बी. खवले, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीगोंदा-कर्जत-जामखेड बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. एस. वाय. पत्की, अॅड. व्ही. एन. घोडके, अॅड. एस. बी. सातपुते, अॅड. इथाटे, अॅड. आर. के. आचार्य, अॅड. पी. जी. गुंजाळ, अॅड. एस. एस. पवार, अॅड. बी. एन. काकडे, अॅड. बी. ए. नागवडे, अॅड. ए. आर. खेतमाळीस, अॅड. सप्रे, अॅड. आर. एस. जठार, अॅड. राजाभाऊ आर. शिर्के, अॅड. एम. एस. लगड, अॅड. सुपेकर, अॅड. पी. जी. इंगळे, अॅड. एस. पी. राऊत, अॅड. एस. एस. शेळके, अॅड. गणेश खेतमाळीस, अॅड. वर्षा कापसे, अॅड. ऐश्वर्या भोसले, अॅड. मेघा माळवदकर, अॅड. अक्षय सप्रे तसेच पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, विविध बँकांचे अधिकारी, नगरपरिषद अधिकारी, महावितरण विभागाचे अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी व पक्षकार उपस्थित होते. या लोक अदालतीमध्ये मोटार अपघात, भू-संपादन, कौटुंबिक वाद, दिवाणी व फौजदारी प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत, नगरपालिका, बँक आणि महावितरणाशी संबंधित खटलापूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती.

# पुण्यातील नोबल हॉस्पिटलची ऐतिहासिक कामगिरी

## महाराष्ट्रातील पहिली रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वी । ५५ वर्षीय महिलेच्या हृदयातील गाठ कीहोल तंत्राने काढली

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

हडपसर येथील नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरने रोबोटच्या सहाय्याने 'रोबोटिक लेफ्ट एट्रियल मिक्सोमा एक्सिजन' ही अत्यंत गुंतागुंतीची हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडत महाराष्ट्रात इतिहास रचला आहे. कीहोल पोर्ट्सद्वारे पूर्णपणे करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया हृदयविकार उपचार क्षेत्रातील महत्त्वपूर्ण टप्पा मानली जात आहे.

ही शस्त्रक्रिया ५५ वर्षीय महिलेवर करण्यात आली. नियमित वैद्यकीय तपासणीदरम्यान त्यांच्या हृदयाच्या डाव्या कप्प्यात गाठ असल्याचे निदान झाले होते. या प्रकारच्या गाठींना 'लेफ्ट एट्रियल मिक्सोमा' असे म्हटले जाते. ही गाठ सामान्यतः कर्करोगजन्य नसली, तरी त्यामुळे स्ट्रोक, धाप लागणे यांसारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे शस्त्रक्रियेद्वारे गाठ काढून टाकणे हा एकमेव प्रभावी उपचार पर्याय मानला जातो.

पारंपरिक पद्धतीत अशी शस्त्रक्रिया करण्यासाठी 'मीडियन स्टर्नोटॉमी' करावी लागते. यामध्ये छाती उघडण्यासाठी छातीचे हाड कापावे लागते. मात्र, नोबल हॉस्पिटलमध्ये प्रथमच ही प्रक्रिया रोबोटच्या सहाय्याने केवळ लहान पोर्ट इन्सिजनद्वारे करण्यात आली. यामध्ये कोणताही मोठा छेद देण्यात आला नाही तसेच छातीचे हाड कापण्याचीही गरज भासली नाही.

या प्रक्रियेदरम्यान हार्ट-लंग मशीनच्या सहाय्याने हृदय तात्पुरते थांबवण्यात आले. त्यानंतर थ्रीडी कॅमेराच्या मदतीने हृदयाच्या डाव्या कप्प्यात प्रवेश करून गाठ अचूकपणे काढण्यात आली.

रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेचे रुग्णांना अनेक थेट फायदे मिळतात. त्यामध्ये कमी रक्तस्राव, शस्त्रक्रियेनंतर कमी वेदना, जलद पुनर्प्राप्ती, रुग्णालयात कमी कालावधीचा मुक्काम आणि मोठ्या व्रणाऐवजी लहान व्रण यांचा समावेश आहे. शस्त्रक्रियेदरम्यान करण्यात आलेले छेदही रोबोटच्या सहाय्याने टाके घालून बंद करण्यात आले.

ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया हृदय शल्यचिकित्सक डॉ. धैर्यशील कणसे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. वरिष्ठ कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. आशिष पोखरकर यांनी सहकार्य केले. शस्त्रक्रिया करणाऱ्या टीममध्ये डॉ. अनिरुद्ध ढेकणे आणि डॉ. एन. जाधव यांचा समावेश होता. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. सम्राट मदनाईक आणि डॉ. परमिता दीक्षित यांनी जबाबदारी सांभाळली.

ही प्रक्रिया भारतीय हृदयरोग शल्यचिकित्सकांनी विकसित केलेल्या 'एसएसआय मंत्रा' या रोबोटिक प्रणालीच्या सहाय्याने करण्यात आली. यामुळे प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान क्षेत्रात भारताची वाढती क्षमता अधोरेखित झाली आहे.

या यशामुळे भविष्यात हृदयविकार उपचार क्षेत्रात नव्या संधी निर्माण होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर पुढे रोबोटिक एएसडी क्लोजर, रोबोटिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि रोबोटिक-असिस्टेड बायपास शस्त्रक्रियांपर्यंत विस्तारण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शस्त्रक्रियेतील कौशल्य वाढत गेल्यास ही पद्धत देशभर तसेच जागतिक स्तरावर अधिक प्रमाणात वापरली जाऊ शकते.

या यशाबद्दल बोलताना डॉ. धैर्यशील कणसे म्हणाले, हृदय शस्त्रक्रियेतील नव्या युगाची ही सुरुवात आहे. रुग्णांना कमीत कमी त्रासात जागतिक दर्जाचे उपचार देण्याच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे.

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ. संजय पठारे म्हणाले, हा टप्पा पुण्यातील हृदयविकार उपचार क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेमुळे अधिक अचूकता, कमी वेदना आणि जलद बरे होण्यास मदत होते. आरोग्यसेवेचे नवे मापदंड निर्माण करण्यासाठी आम्ही अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळात सातत्याने गुंतवणूक करत राहू.

डॉक्टरांच्या टीमचे अभिनंदन करताना उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने म्हणाले, अशा प्रकारच्या प्रगतीमुळे हृदयविकार उपचारांची गुणवत्ता उंचावेल आणि प्रगत रोबोटिक हृदयशस्त्रक्रियेच्या क्षेत्रातील क्षमता अधिक बळकट होईल. रुग्ण-केंद्रित आणि तंत्रज्ञानाधारित आरोग्यसेवेसाठी आम्ही सातत्याने नवे मापदंड निर्माण करत राहू.

ते पुढे म्हणाले, आज पुणे अत्याधुनिक हृदयरोग उपचारांसाठी जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण करत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तज्ज्ञ शल्यचिकित्सकांद्वारे प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अत्याधुनिक रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया पुण्यात यशस्वीपणे होऊ शकते, हे आमच्या टीमने सिद्ध केले आहे. अद्ययावत उपचारांसाठी रुग्णांना परदेशात जाण्याची गरज उरलेली नाही.

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप माने म्हणाले, आमच्या हॉस्पिटलमध्ये रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेची सुरुवात ही तंत्रज्ञान आणि वैद्यकीय उत्कृष्टतेप्रती असलेल्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. योग्य नियोजन, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि कुशल बहुशाखीय टीमच्या समर्पणामुळे ही ऐतिहासिक कामगिरी शक्य झाली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल चा दहावीचा १००% निकाल

**अकोले । वीरभूमी–**
मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलने इयत्ता दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. श्रेयस सोपान लोहटे याने ९५% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. ज्ञानेश्वरी विजय नवले हिने ९४.४०% द्वितीय, तर पायल दत्तात्रय कोटकर हिने ९४.२०% गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच सिद्धी शिवाजी खोंड (९२%), अदिती सुशांत सुशांत गजे (९१.८०%), श्रावणी किरण उकिर्डे (९१.४०%) आणि सिद्धार्थ सचिन चव्हाण (९०.६०%) यांनीही विशेष प्राविण्य मिळवले. संस्थेच्या या भरीव यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव तथा अभिनव पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., वसुंधरा उपप्राचार्य राधिका नवले, पर्यवेक्षक पराग सानप, विभाग प्रमुख स्मिता पुंड, समुपदेशक आरती जाधव यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अशा प्रकारे अभिनव शिक्षण संस्था ने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखत यंदाही यशाची नवी उंची गाठली आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीत ३५ हजार ९३२ प्रकरणे निकाली

**सुमारे ५० कोटी रुपयांची तडजोड । जिल्हा न्यायालयासह सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालत उत्साहात**

**अहिल्यानगर । वीरभूमी –**
राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि. ९ मे २०२६ रोजी जिल्हा न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले.



या लोकअदालतीत मोठ्या प्रमाणावर प्रकरणांचा निपटारा होऊन सुमारे ५० कोटी रुपयांची तडजोड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. योगेश पैठणकर यांनी दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीत जिल्ह्यातील विविध न्यायालयांमधील दिवाणी व फौजदारी प्रकरणे, धनादेश व चेक अनादर प्रकरणे, बँक कर्जवसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई दावे, कामगार न्यायालयातील प्रकरणे, कौटुंबिक वाद, वीज महावितरणाशी संबंधित समझोता योग्य प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची दाखलपूर्व प्रकरणे आपसी समझोत्यासाठी ठेवण्यात आली होती.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील एकूण ३३ हजार ८१६ दाखलपूर्व प्रकरणे मिटविण्यात आली तर २ हजार ११६ प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. तसेच विशेष मोहिमेंतर्गत ८७८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. अशा प्रकारे एकूण ३५ हजार ९३२ प्रकरणे यशस्वीरित्या निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, सर्व वकील संघटना, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा पोलीस प्रशासन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच जिल्ह्यातील सर्व न्यायलयीन कर्मचारी व विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनीही विशेष योगदान दिले.

## संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेची ५४२ प्रलंबित प्रकरणे त्वरित मार्गी लावा

### आ. विवेक कोल्हे यांची तहसील प्रशासनाला सूचना

**कोपरगाव । वीरभूमी–**
संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ योजनेअंतर्गत तब्बल ५४२ प्रकरणे पात्र-अपात्र निवडीसाठी तहसील कार्यालयात प्रलंबित असून या प्रकरणांची पात्रता व अपात्रता तपासण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. केवळ मीटिंग होत नाही म्हणून हे प्रकरणे प्रलंबित आहे. संबंधित लाभार्थ्यांना निर्णयाची प्रतीक्षा लागली असून ही प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत, अशी सूचना आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी तहसील प्रशासनाकडे केली आहे.

आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे एकूण ११ हजार ९९५ लाभार्थी आहेत. मात्र सध्या तहसील कार्यालयात या योजनांशी संबंधित अडचणी सोडविण्यासाठी वेळेवर बैठका होत नसल्याने तब्बल ५४२ प्रस्ताव प्रलंबित राहिले आहेत त्या नागरिकांचे आर्थिक नुकसान या हलगर्जीपणामुळे होते आहे.



कोपरगाव तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात लाभार्थी या योजनांचा लाभ घेण्यासाठी तहसील कार्यालयात येत असतात. मात्र त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेषतः वयोवृद्ध, महिला व निराधार लाभार्थ्यांना वारंवार तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत आहेत. गोरगरीबांच्या प्रस्तावांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना लाभार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे.ज्यांच्याकडे जबाबदारी होती त्या लोकप्रतिनिधीनी ती वेळेत पार पाडणे अपेक्षित होते मात्र तसे न झाल्यामुळे कित्येक काळ नागरिक या बैठकीच्या प्रतीक्षेत होते.

काही वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची तक्रार असून कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी किचकट अटी लादल्या जात असल्याने सर्वसामान्य लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. लाभार्थी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही संबंधित प्रस्तावांवर बैठका होत नसल्याने आणि याद्या जाहीर न केल्याने लाभार्थ्यांमध्ये स्थानिक पातळीवर झालेल्या दुर्लक्षामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय, कोपरगाव पंचायत समितीमार्फत छत्रपती राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत योजनेअंतर्गत ४४ प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हा व तालुका स्तरावरून मोठ्या प्रमाणात वृद्ध कलावंतांचे प्रस्ताव पाठविले जात असतानाही त्यांना वेळेत मंजुरी मिळत नसल्याने संबंधित अडचणींकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केली आहे.

## श्रीगोंद्यात जनगणना प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण शिबिर उत्साहात



**श्रीगोंदा । वीरभूमी–**
जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यात १६ मे ते १४ जून दरम्यान होणाऱ्या घरगणना कामकाजासाठी श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण शिबिर महाराजा जीवाजीराव शिंदे महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या प्रशिक्षण शिबिरास तहसीलदार तथा उपविभागीय चार्ज अधिकारी सचिन डोंगरे, उपजिल्हाधिकारी विनीत शिर्के तसेच कुमार चिंचकर यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. दि. २३ एप्रिल ते ८ मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या १२ दिवसीय प्रशिक्षण शिबिरात चार बॅचमध्ये प्रत्येकी सुमारे १५० प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. एकूण ५९७ जणांपैकी ५१० प्रगणक व ८७ पर्यवेक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणासाठी उत्तरेश्वर मोहळकर, राजेंद्र येवले, राजेंद्र ठुबे, प्रवीण तांबे, राजेंद्र पवार, शिवलिंग गेरंगे, हरिभाऊ वाघीरे व प्रदीप उंडे यांनी फील्ड ट्रेनर म्हणून काम पाहिले.

जनगणना प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन करत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षणार्थींना फील्डवरील कामकाजाची माहिती देण्यात आली. शिबिरादरम्यान श्रीगोंदा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, गटविकास अधिकारी राणी फराटे तसेच गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी यांनी सदिच्छा भेट देऊन प्रशिक्षणार्थींचे कौतुक केले. तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना सहाय्यक चार्ज अधिकारी संतोष झाडे, अतिरिक्त चार्ज अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार मिलिंद जाधव आणि जनगणना सहाय्यक प्रकल्प अधिकारी किशोर किसवे यांनी प्रशिक्षण शिबिराचे नियोजन यशस्वीपणे पार पाडले.

## श्री समर्थ विद्या मंदिरेचा निकाल शंभर टक्के

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, माध्यमिक विभाग यांनी सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या सर्व २३२ विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रावणी गणेश दळवी हिने ९७.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. मंजुषा महेश बोरकर हिने ९६.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. ईश्वरी सुनील पवार हिने ९६.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. या तिन्ही विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून त्यांच्या यशामुळे विद्यालयाच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर शिस्त, सातत्य आणि अभ्यासू वृत्ती यामध्येही विशेष ठसा उमटविला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या अथक परिश्रमांना शिक्षकांनी दिलेले योग्य मार्गदर्शन आणि पालकांनी दिलेले प्रोत्साहन यांची जोड मिळाल्याने हा उल्लेखनीय निकाल शक्य झाल्याचे बोलले जात आहे.

# शिरसाटवाडीतील विकासकामांची समितीकडून पाहणी

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान । अधिकाऱ्यांकडून सरपंच भावना पालवे यांच्या कार्याचे कौतुक**

**पाथर्डी । वीरभूमी–**
मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत पाच सदस्यीय शासकीय समितीने तालुक्यातील शिरसाटवाडी येथे भेट देऊन गावातील विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी समितीचे प्रमुख तथा गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांनी गावात झालेल्या विकासकामांचे तसेच सरपंच सौ. भावना पालवे यांच्या कार्याचे कौतुक केले.

समितीने गावातील सिमेंट काँक्रीट रस्ते, देवस्थान सभामंडप, भूमिगत गटारे, स्ट्रीट लाईट, सिंगल फेज वीज व्यवस्था, सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय, अद्ययावत व्यायामशाळा, रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसह विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी बोलताना अधिकाऱ्यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून गावात पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि त्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास साधणे हे सरपंचाचे प्रमुख कर्तव्य असल्याचे सांगितले. शिरसाटवाडीमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या विकासकामांबाबत समाधान व्यक्त करत समितीने सरपंच सौ. भावना पालवे यांचे विशेष कौतुक केले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, ग्रामसेवक अशोक साळुंखे, ग्रामपंचायत सदस्य जनाबाई शिरसाट, कर्मचारी अंकुश शिरसाट, अशोक फुंदे आणि बाबुराव शिरसाट उपस्थित होते.

जिल्ह्यात मनसेची सत्ता असलेली शिरसाटवाडी ही एकमेव ग्रामपंचायत असून मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या पत्नी सौ. भावना पालवे या सरपंच आहेत.

## संजीवनी सैनिकी स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के; साई बोळीज प्रथम

**कोपरगाव । वीरभूमी–**
संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्यु. कॉलेजने दहावीच्या परिक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. कॅडेट साई विष्णू बोळीज यांने ९४ टक्के गुण मिळवुन प्रथम क्रमांक पटकाविला. शैक्षणिक गुणवत्ता, सैनिकी शिस्त आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने यंदाही नेत्रदीपक यश संपादन केले आहे.

या परीक्षेत कॅडेट वेदांत संदीप खेतमाळस याने ९२ टक्के गुण मिळवुन दुसरा क्रमांक तर कॅडेट पार्थ प्रशांत तळेकर ९१ टक्के गुण मिळवुन तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. यंदाच्या परीक्षेसाठी शाळेचे एकूण ४५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ३५







विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत संस्थेच्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे.विशेष म्हणजे, चालू शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय स्तरावरील ‘ब्रास बँड स्पर्धेत राष्ट्रीय विजेती’ ठरलेल्या या शाळेने शैक्षणिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणारे हे गुणवंत विद्यार्थी ब्रास बँड स्पर्धेमध्येही आपल्या शाळेचे नेतृत्व करत होते. त्यामुळे शिस्त, नेतृत्वगुण, सांघिकता आणि शैक्षणिक गुणवत्ता यांचा उत्कृष्ट मिलाफ या विद्यार्थ्यांमध्ये पहायला मिळाला.

विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, विश्वस्त सुमित कोल्हे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच प्राचार्य के. एल. दरेकर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या परिश्रमांचेही कौतुक करण्यात आले. शिस्त, गुणवत्ता आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा या त्रिसूत्रीवर कार्यरत असलेल्या संजीवनी सैनिकी स्कूलच्या या उल्लेखनीय यशामुळे कोपरगाव तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गावपातळीवरील वाद मिटवून विकासकामांना गती द्या

## आ. मोनिका राजळे | टाकळीमानुर येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर



**• पाथर्डी | वीरभूमी –**

पाथर्डीच्या अक्षय पवारची केंद्रीय लोकसेवा आयोगात घवघवीत कामगिरी

घिसाडी समाजातील पहिला आयएफएस अधिकारी; देशात ८१ वी रँक मिळवत तालुक्याचा गौरव

पाथर्डी प्रतिनिधी : तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक महेश भागवत यांचे योग्य वेळी मिळालेले मार्गदर्शन, विद्यार्थी दशेत 'बर्ड' संस्थेतर्फे केंद्रीय लोकसेवा आयोगात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची ऐकलेली व्याख्याने आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर अधिकारी होण्याचे स्वप्न साकार झाले, अशी भावना केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेले पाथर्डीचे सुपुत्र अक्षय हरिभाऊ पवार यांनी व्यक्त केली.

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी सायंकाळी जाहीर झाला. त्यामध्ये अक्षय पवार यांनी देशात ८१ वी रँक मिळवत भारतीय वन सेवेत (आयएफएस) यश संपादन केले. निकालाची माहिती मिळताच त्यांच्या आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. राज्यातील घिसाडी समाजातील आयएफएसमध्ये निवड होणारे ते पहिले विद्यार्थी ठरले आहेत.

पाथर्डी तालुक्याचे भूमिपुत्र तथा तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक महेश भागवत हे तालुक्यातील पहिले आयपीएस अधिकारी ठरले होते. त्यानंतर आता अक्षय पवार यांनी आयएफएसमध्ये यश मिळवत तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांच्या यशामुळे संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

अक्षय यांचे आजोबा स्वर्गीय साहेबा घिसाडी यांचा नातू केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याने गावात सर्वत्र कौतुक होत आहे. 'अजातशत्रू' परिवार म्हणून ओळख असलेल्या पवार कुटुंबीयांच्या घरी अभिनंदनासाठी नागरिकांची अक्षरशः रीघ लागली होती. शनिवारी सायंकाळी कुटुंबीयांनी नातेवाईकांसह घरासमोर मांडव टाकून वाजंत्रीच्या गजरात जल्लोष साजरा केला.

विशेष म्हणजे, निकाल जाहीर झाला त्या वेळी अक्षय हे घरी पारंपरिक लोहारकाम करत तप्त लोखंडावर घणाचे घाव घालत होते.

अक्षय यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद नाथनगर शाळेत झाले, तर बारावीपर्यंतचे शिक्षण जैन विद्यालयात पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी पुण्यातील सीओईपी महाविद्यालयातून धातुशास्त्र विषयात बी.टेक. पदवी प्राप्त केली. विशेष म्हणजे, महेश भागवत यांनीही याच महाविद्यालयातून शिक्षण घेतले आहे.

गेल्या पाच वर्षांपासून अक्षय यूपीएससीची तयारी करत होते. कोणताही खासगी क्लास न लावता स्वयंअभ्यासाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून दिल्लीतील 'हमदर्द स्टडी सर्कल'मध्ये त्यांची निवड झाली. त्यामुळे अत्यल्प खर्चात त्यांना सर्व सुविधा उपलब्ध झाल्या.

घरची आर्थिक परिस्थिती, कुटुंबीयांचे कष्टमय जीवन आणि संघर्षाचे वास्तव डोळ्यासमोर ठेवून त्यांनी अभ्यास सुरू ठेवला. मिळालेली रँक समाधानकारक असली, तरी आयएएस होण्यासाठी पुन्हा परीक्षा देण्याचा त्यांचा मानस आहे.

वनविभागाच्या परीक्षेच्या तयारीदरम्यान त्यांनी पुण्यात 'जल मैत्री' उपक्रम राबवला. मंदिरांमधील निर्माल्यापासून पूजासाहित्य तयार करून जलप्रदूषण रोखण्याचा हा उपक्रम यशस्वी ठरला. योगायोगाने मुलाखतीतही जलप्रदूषणासंदर्भातील प्रश्न विचारण्यात आला होता.

आई-वडील अशिक्षित असले, तरी त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी मोठे कष्ट घेतले. अक्षय यांचा भाऊ पदवीधर असून बहिणीने एमएससी बायोकेमिस्ट्रीचे शिक्षण पूर्ण केले आहे. आजही कुटुंबाचा उदरनिर्वाह पारंपरिक लोहारकामावरच सुरू असून घरातील सर्व सदस्यांना हे काम अवगत आहे.

माझे यश पाहण्यासाठी आजोबा, आजी आणि काका आज हयात असते तर त्यांना खूप आनंद झाला असता, असे सांगताना अक्षय भावूक झाले. ओबीसी प्रवर्गासाठी 'महाज्योती' योजनेंतर्गत मिळालेली शिष्यवृत्तीही मोठी मदत ठरल्याचे त्यांनी सांगितले.

साडेसहा लाख विद्यार्थ्यांमधून झालेली निवड आपण सार्थ ठरवू. समाजबांधवांसाठी काम करू, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

मुलाखतीदरम्यान अधिकाऱ्यांनी 'अक्षय' या नावाचा अर्थ विचारला. त्यावर अक्षय म्हणजे कधीही नाश न पावणारे, असे उत्तर त्यांनी दिले. अधिकाऱ्यांनी शरीराचाही क्षय होतो, असा प्रतिप्रश्न केल्यावर अक्षय यांनी तत्परतेने, शरीराचा क्षय होतो, पण संस्कार, विचार आणि कार्याचा कधीही क्षय होत नाही, असे उत्तर दिले. त्यांच्या या उत्तराने मुलाखतकारही प्रभावित झाले.

लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये प्रचंड स्पर्धा असून शेवटच्या टप्प्यात गुणांच्या सूक्ष्म फरकावर निवड ठरते. या परीक्षेत बुद्धिमत्तेबरोबरच नशिबाची साथही आवश्यक असते. कष्ट, संयम आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्यास यश नक्की मिळते, असे अक्षय यांनी सांगितले.

राज्यातील घिसाडी ेलळशींतील पहिला आयएफएस अधिकारी म्हणून अक्षय पवार यांच्या निवडीमुळे समाजात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. अत्यंत साधी राहणी, नम्र स्वभाव आणि प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधणाऱ्या अक्षय यांनी भेटायला आलेल्या अनेक ज्येष्ठांचे आशीर्वाद घेतले.

वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुप, अॅड. प्रताप ढाकणे, आमदार मोनिका राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, श्रीतिलोक जैन विद्यालय तसेच सोहेल फकीर, तेजस पटवा, गौतमी खाटेर आणि विविध संस्था, संघटना व मित्रपरिवाराने अक्षय यांचे अभिनंदन केले. महेश भागवत यांनी कार्यातून तालुक्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचवले. अक्षय पवार यांनीही अशीच उल्लेखनीय कामगिरी करावी, अशा शुभेच्छा गावकऱ्यांनी दिल्या.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून आपले प्रश्न सोडवून घ्या : आ. विवेक कोल्हे

**• कोपरगाव | वीरभूमी–**

कोपरगाव मतदारसंघात शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान विविध ठिकाणी संपन्न होणार असून, नागरिकांच्या दैनंदिन महसुली अडचणी तत्काळ सोडविण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध महसूल विभागाशी संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत यासाठी दिनांक ११ मे रोजी सकाळी ९ वाजता हनुमानमंदिर शेजारी सभागृह,दहेगांव बोलका, पोहेगाव १० वाजता वक्रतुंड मंगल कार्यालय,त्याच प्रमाणे १५ मे रोजी कोपरगाव शहरात कलश मंगल कार्यालय येथे संपन्न होणार आहे त्यात आपले प्रश्न सोडवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.



दहेगाव बोलका महसूल मंडल विभागातील सर्व गावे,पोहेगाव महसूल मंडल विभागातील सर्व गावे आणि कोपरगाव शहर आणि कोपरगाव महसूल मंडलातील त्या कार्यक्षेत्रातील नागरिकांनी उपस्थित राहून त्यांचे प्रश्न मांडावे असे आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी आवाहन केले आहे.

या अभियानात सातबारा उतारा, फेरफार नोंदी, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, निवासी दाखले, वारस नोंद, जमीन मोजणी, ई-पीक पाहणी, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई संदर्भातील प्रश्न तसेच इतर महसुली कामांबाबत मार्गदर्शन व तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या समस्या व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराजस्व अभियानामुळे नागरिकांना कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागणार नाहीत तसेच प्रशासन व जनतेमधील समन्वय अधिक मजबूत होणार आहे. गावपातळीवरच महसुली सेवा उपलब्ध होत असल्याने सामान्य नागरिक, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांपैकी एक असलेल्या या अभियानात महसूल विभागाचे व संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या विविध प्रश्नांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रयत शिक्षण संस्थेच्या 'मॅनेजिंग कौन्सिल'वर बाबासाहेब भोस यांची निवड

**• श्रीगोंदा | वीरभूमी–**



रयत शिक्षण संस्थेच्या 'मॅनेजिंग कौन्सिल' समितीवर सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील जेष्ठ कार्यकर्ते बाबासाहेब भोस यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे श्रीगोंदा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात आनंद व्यक्त होत असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

दि. ९ मे रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त सातारा येथे आयोजित भव्य कार्यक्रमात या निवडीची घोषणा करण्यात आली.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यांना संस्थेच्या विविध प्रशासकीय व धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येते. संस्थेच्या अधिकाऱ्यांची निवड, संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे तसेच संस्थेच्या प्रगतीसाठी आवश्यक सुधारणा व उपाययोजना सुचविण्याचे महत्त्वपूर्ण अधिकार या समितीकडे असतात.

बाबासाहेब भोस यांनी गेल्या अनेक वर्षांपासून रयत शिक्षण संस्था तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने कार्य केले आहे. विद्यार्थ्यांसाठी केलेले योगदान, सामाजिक उपक्रमांमधील सक्रिय सहभाग आणि संस्थेविषयीची निष्ठा याची दखल घेत त्यांची या महत्त्वाच्या समितीवर निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार, उपाध्यक्ष ड. भगीरथ शिंदे, खासदार रामशेठ ठाकूर तसेच कार्यकारिणी सदस्यांनी एकमताने ही निवड केली. या निवडीबद्दल श्रीगोंदा व अहिल्यानगर परिसरातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी बाबासाहेब भोस यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# काकणेवाडीत 'गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार' योजनेचा शुभारंभ

## आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते कामास प्रारंभ | जलसंधारणातून शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**• पारनेर | वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील काकणेवाडी येथे महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत कामाचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते संपन्न झाला. जलसंधारण, शेती विकास आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.

याप्रसंगी प्रदीप वाळुंज, सरपंच गिताराम वाळुंज, जयवंतशेठ वाळुंज, भास्कर वाळुंज, ज्ञानदेव वाळुंज, दगडू वाळुंज, बाळासाहेब वाळुंज, संदीप वाळुंज, मधुकर झावरे, मारुती वाळुंज, अशोक वाळुंज, योगेश वाळुंज, संपत वाळुंज, भाऊसाहेब वाळुंज, सोन्याबापू वाळुंज, ओंकार पुरी, प्रणव वाळुंज, भगवान वाळुंज, दत्तात्रय किसन वाळुंज, सुभाष वाळुंज, रविंद्र वाळुंज, लक्ष्मण वाळुंज, सुनिल वाळुंज, नामदेव वाळुंज, मंगेश वाळुंज, पोपट वाळुंज आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत धरणांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ बाहेर काढून तो शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे धरणांची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होते. दुसरीकडे, गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढून शेती उत्पादनातही भरघोस वाढ होते. नैसर्गिक पोषक घटकांनी युक्त असलेला हा गाळ पिकांसाठी नैसर्गिक खताचे काम करत असल्याने रासायनिक खतांवरील खर्चातही मोठी बचत होणार आहे. यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, पाणी हा भविष्यातील सर्वात मोठा प्रश्न असून जलसंधारण ही काळाची गरज आहे. 'गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार' योजना ही केवळ धरण स्वच्छ करण्याची मोहीम नसून शेतकऱ्यांच्या समृद्धीचा आणि शाश्वत शेतीचा मार्ग आहे. धरणातील गाळ शेतात गेल्याने जमिनीची उत्पादकता वाढते, तर धरणात अधिक पाणीसाठा उपलब्ध होऊन भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होते. शासनाच्या अशा लोकहिताच्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.



तसेच त्यांनी शेतकऱ्यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करत जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग आवश्यक असल्याचे नमूद केले. आजची पाण्याची बचत ही उद्याच्या पिढीसाठीची मोठी गुंतवणूक आहे. गावागावात जलसंवर्धनाची चळवळ उभी राहिली तरच भविष्यातील पाणीप्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय होऊ शकतो, असेही ते म्हणाले. मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारी ही योजना राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे सुरू असून, धरणांची साठवण क्षमता वाढवणे आणि शेतकऱ्यांच्या जमिनीचा दर्जा उंचावणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.